(58) 21-22



स्वातंत्र्याप्रसंगी निर्माण झालेले प्रश्न

# संस्थानांचे विलगीकरण :- जुनागड प्रश्न, हैदराबाद प्रश्न आणि काश्मीर प्रश्न

प्रा. डॉ. वैशाली शांताराम वागुल

राज्यशास्त्र विभाग, कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनावणे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सटाणा, जि. नाशिक.

प्रस्तावना :

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले, त्यावेळी भारताच्या एकात्मतेसमोर दोन मोठे प्रश्न निर्माण झाले होते. त्यापैकी एक म्हणजे धर्माच्या आधारावर होणारी दोन राष्ट्रे आणि भारतातन असणाऱ्या एकूण ५६५ संस्थानांचे विलिनीकरण. हि ५६५ संस्थाने भारतात कशी विलीन करून घ्यावीत हि मोठी समस्या निर्माण झाली होती. ५६५ पैकी ५६२ संस्थाने भारतात विलीन झाली. परंतु काश्मीर, जुनागड आणि हैदराबाद संस्थान मात्र विलीन होण्यास तयार नव्हती. अशावेळी या तिन्ही संस्थांनान बाबत काय धोरण अवलंबिले? कशा पद्धतीने त्याचे भारतात विलिनीकरण झाले? या बाबतचा आढावा या संशोधन लेखात करण्यात आला आहे.

संशोधन लेखाचा अभ्यास करतांना ग्रंथालयीन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

भारतातील संस्थानाचे ऐतिहासिक पार्श्वभूमी:

बंगाल बिहार ओरिसाचे महसूल हक्क मोगल बादशाह दुसरा शाह आलम याजकडून १७६५ मध्ये रोबर्ट क्लाईव्हने मिळविल्यानंतर ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता भारतात दृढ झाली. त्यानंतर कंपनीने भारतात राज्यविस्ताराचे धोरण अवलंबिले. त्यातून १८५७ पर्यंत जी राज्ये बचावली, त्यांना भारतीय संस्थाने म्हणून ओळखले जाते, त्यापैकी बऱ्याच संस्थानिकाचा दावा त्यांचे घराणे प्राचीन आहे असा असला तरी त्रावणकोर, उदयपुर हि घराणी मात्र अठराशे वर्षे जुनी देखील होती. बहुसंख्य राज्य हि मोगल, मराठे, हैदर-टिपू किंवा शीख यासारख्या प्रबल सत्तांची मांडलिक होती. या प्रमुख सत्तांच्या ऱ्हासामुळेच ब्रिटीशांचे बळ वाढत होते. अठराव्या शतकात विस्तार कोर्ट ऑफ डायरेक्टरच्या नकळत झाला. १९ व्या शतकात मात्र तो त्यांच्या संमतीने झाला, यात प्रामुख्याने वॉरन हेस्टिंग्ज, रिचर्ड वेलस्ली, मार्केज ऑफ हेस्टिंग्ज, जेम्स डलहौसी या गव्हर्नर्स जनरलचा मोठा हातभार होता. वॉरन हेस्टिंग्जने तहनाम्याद्वारे शेजारील राज्यांच्या सरहद्दी बळकट करुन मराठे-हैदर विरुद्ध तट उभारला. वेलस्लीने देशी राज्यांना तैनाती फौजांचे संरक्षण देऊन कंपनीचे प्रभुत्व स्थापन केले. तर मार्केज ऑफ हेस्टिंग्जने तह करतांना राज्यांच्या परराष्ट्रीय धोरणावर पूर्णपणे नियंत्रण आणले. हे तह आणि करार सुरुवातीला कंपनीने मित्रत्व आणि समानतेच्या भूमिकेतून केले, पण एकोणिसाव्या शतकापासून त्या जागी ब्रिटीशांचे वर्चस्वाची भूमिका प्रामुख्याने दिसू लागले. पुढे पुढे यात करार करताना जुलमी कारभाराविरुद्ध हस्तक्षेप करू असेहि धोरण येऊन हे कलम त्यात यायला लागले. लॉर्ड विल्यम बेंटिंक सारख्या उदारमतवादी गव्हर्नर जनरल ने सुद्धा कंपनीचा राज्यविस्तार वाढवला, यात प्रामुख्याने म्हैसूर, काचार, जैतिया, कोडगू इत्यादी प्रदेश होते. त्यानंतरच्या लॉर्ड ऑकलंड ने देखील कर्नल, मांडवी,कुलाबा, जालौन इत्यादी. तर लॉर्ड एडवर्ड ने सुरत,ग्वाल्हेर यांनी देखील हस्तक्षेपाचे धोरण स्वीकारले. १८३४ मध्ये कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनि स्पष्ट केलेले खालसा करण्याचे धोरण लॉर्ड जेम्स डलहौसीने अमलात आणले. त्या अगोदरच परकीय आक्रमणे, अंतर्गत बंडाळी, गैरकारभार या सर्व कारणांनी संस्थानांची अर्थ व्यवस्था कोलमडून पडली होती. औरस पुत्र नसला कि कंपनी कोणत्याही तहात असताना राज्य ताब्यात घेई. औरस वारस नाही म्हणून डलहौसीने सातार (१८४८), जैतपुर, संबलपुर, बाघत (१८५०), उदयपुर, ओरिसा (१८५२)म नागपूर (१८५४), झांशी (१८५३) हि राज्य खालसा केली. दुसऱ्या बाजीराव पेशव्याचे निवृत्ती वेतन त्यांचा दत्तक पुत्र नानासाहेबाला दिले नाही. कंपनीचे सर्व प्रकारचे सार्वभौमत्व मान्य असलेल्या अयोध्येचा नवाब वाजीद अलीचे राज्य गैरकारभारामुळे डलहौसीने खालसा केले.

अठराशे सत्तावन्नच्या उठावात बहुसंख्य संस्थानिक तटस्थ होते. तर काहींनी (निजाम,शीख,शिंदे) यांनी मदत केली. या संस्थांनान मुळेच कंपनी बचावली असे लॉर्ड जॉन केनिंगचे म्हणणे होते. हा उठाव मोडून काढल्यानंतर राणी व्हिक्टोरियाने १८५८ च्या जाहीरनाम्यात यापुढे राज्यविस्तार न करण्याचे, कंपनीने केलेले तह व करार पाळण्याचे आणि संस्थानिकांना सर्व हक्क कायम ठेवण्याचे वचन दिले. सर्व भारतीय संस्थानिकांना दत्तक घेण्याबद्दल सनदा मिळाल्या. त्यानुसार वोडेयर

राजवंशाला म्हैसूर परत मिळाले (१८८१). ओरीसातील खंडणी देणाऱ्या महालांना संस्थानांचा दर्जा प्राप्त झाला (१८८८). काश्मीरचा राजा गुलाबसिंगला तर राज्यविस्तार सुद्धा करू दिला. बनारस संस्थानाची पुनर्रचना झाली (१९११). थोडक्यात या सर्व धोरणामुळे अस्तित्वात आलेली ५९९ संस्थाने स्वातंत्र्यपूर्व भारतात होती.

स्वातंत्र्यापर्यंतची संस्थानिकांची स्थिती:

ब्रिटीश राजवटीत हिंदुस्थानचे ब्रिटीश भारत व संस्थानिकांचे राज्य अशा दोन भागात करण्यात आले. संस्थानिक ब्रिटीश सरकारचे मांडलिक होते. १७५७ ते १८१३ या काळात संस्थाना सन्मानाची वागणूक दिली. १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यामुळे संस्थानांना अभय देण्यात आले. पुढील काळात ब्रिटीश रेसिडेन्सीच्या माध्यमातून संस्थानाच्या राज्यकारभारातील हस्तक्षेप सुरूच होता. १९१९ च्या मॉंटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा कायद्यानुसार चेंबर ऑफ प्रिन्सेस या संस्थानिक संघटनेची निर्मिती ८ फेब्रुवारी १९२१ मध्ये करण्यात आली. यामध्ये १२० संस्थानिक सभासद झाले. परंतु राज्याच्या एकीकरणाच्या दृष्टीने कोणतीहि कामगिरी झाली नाही. लॉर्ड माउंट बेटन यांनी फाळणीची योजना मांडली. भारतातील सर्व पक्षांची त्यास मान्यता मिळविली. ३ जून १९४७ ची फाळणीची योजना मान्य झाल्यावर संस्थानाच्या विलीनिकरणासाठी ५ जुलै रोजी सरकारने एक संस्थान खाते (मंत्रालय) स्थापन केले. गृहमंत्री सरदार पटेल त्याही खात्याचे मंत्री तर व्हि.पी. मेनन सचिव होते. १८ जुलै १९४७ रोजी संस्थानाच्या विलीनिकरणासाठी कायदा संमत झाला. हिंदुस्थानातील संस्थानिकांची संख्या ५६२ एवढी होती. १/४ लोकसंख्या व २/५ प्रदेश संस्थानिकांच्या ताब्यात होता. अशा या विलीनीकरणाच्या एकीकरणाचे महान राष्ट्रीय कार्य सरदार पटेल यांचे कडे होते. संस्थानिकांसमोर ब्रिटीशांनी तीन मार्ग ठेवले.

१. स्वतंत्र भारतात विलीन होणे.
२. स्वतंत्र पाकिस्तान मध्ये विलीन होणे. आणि
३. स्वतःचे स्वतंत्र राज्य निर्माण करणे.

भारतात हे सर्व घडत असतांना संस्थानिकच्या संस्थांतील प्रजा देखील स्वातंत्र्य बद्दल जागरूक झाली होती. त्यानुसार त्या प्रजेने चळवळ संस्थानिकांच्या विरोधात करेन हि देखील भीती संस्थानिकांना होतीच. भारत सरकारचे धोरण विलीनीकरण हे संस्थानिकांच्या नव्हे तर तेथील जनतेच्या इच्छेनुसार व्हावे असे होते. संस्थाने विलीन व्हावीत म्हणून फक्त संरक्षण, दळणवळण व परराष्ट्र व्यवहार या तीन विषयात त्यांनी विलीन होण्यापुरत ९ कलमांचा एक विलीननामा सरकारने तयार केला होता. ५ जुलै च्या संस्थान खात्याच्या उद्घाटन प्रसंगी सरदार पटेलांनी संस्थानिकांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवत मातृभूमी वरील प्रेम, निष्ठा, संस्कृती, मित्रत्व, व राष्ट्रीयत्वाची साद घालत आवाहन केले. २५ जुलै च्या परिषदेत लॉर्ड माउंट बेटन यांनी परिषदेत संस्थानिकाचे मन वळवून विलीननाम्यावर सह्याचा कार्यक्रम पार पडला. यानुसार

1. लहान राज्याचे शेजारील मोठ्या राज्यात विलीनीकरण :- मुंबई,मद्रास,ओरिसा, छत्तीसगड, पूर्व पंजाब व पश्चिम बंगाल मधील छोट्या मोठ्या संस्थानिकांचे विलीनीकरण करण्यात आले.
2. स्टेट युनियनच्या स्वरूपात विलीनीकरण:- यानुसार भौगोलिक, भाषिक व सामाजिक एकतेचा विचार करून २२२ संस्थानिकांचा समावेश करून सौराष्ट्र (काठीयावाडा) ची निर्मिती करण्यात आली.
3. केंद्रशासित प्रदेशाच्या स्वरूपात विलीनीकरण :- हिमाचल प्रदेश, विंध्यप्रदेश व कच्छ प्रदेश यासाठी लागू करण्यात आली.

सरदार पटेल यांनी अत्यंत मुत्सद्देगिरी व कणखर धोरणाचा अवलंब करून १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत जुनागड, हैदराबाद व काश्मीर वगळता सर्व संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करण्यात यशस्वी झाले. मात्र जुनागड, हैदराबाद आणि काश्मीर मात्र काही कालावधी नंतर भारतात प्रयत्न पूर्वक सामील केले गेले. या तिन्ही संस्थांचे भारतात सामील न होण्याचे काही कारणे होती त्याचा थोडक्यात आढावा पुढे घेता येतो.

१. जुनागड :

जुनागड हे सौराष्ट्राच्या किनाऱ्यावरील भारतीय भू भागाने वेढलेले व पाकिस्तानशी भौगोलिक सलगता नसणारे संस्थान होते. मोहम्मद शेरखान बाबी राजवंश हा याचा संस्थापक होता. १६५४ मध्ये बाबी नवाबाने जुनागडवर वर्चस्व मिळविले, नंतर मुघल साम्राज्याचा भाग म्हणून ओळखला गेला. महाबतखान हा या संस्थांनाचा नवाब होता. जुनागडने

क्षेत्रफळ ३०,३३७ चौ.मैल होते, तर लोकसंख्या ६,७०,७१९ एवढी होती. त्यापैकी ८० टक्के हिंदू तर २० टक्के मुस्लीम प्रजा होती. १५ ऑगस्ट १९४७ रोजी नवाब महाबतखानने जुनागढ संस्थान पाकिस्तानात सामील होत असल्याचे जाहीर केले. पाकिस्तानातील जीनांशी त्याने गुप्तपणे पत्रव्यवहार केला. पाकिस्थान सरकारने १३ सप्टेंबर १९४७ जुनागढ संस्थान पाकिस्थानात विलीन होत असल्याचे भारत सरकारला कळविले याबाबत जुनागढशी जैसे थे करार झाल्याचे जाहीर केले. ८० टक्के हिंदू असलेल्या जनतेचे कोणतेही मत विचारात न घेता नवाबाने हा निर्णय घेतला होता. नवाब महाबतखान हा चैनी,विलासी व एशआरामी होता त्याचा हा निर्णय जनतेला तिचा अपमान कारक वाटला त्यामुळे जनतेने त्याच्या विरोधात आंदोलन केले. या आंदोलनाला भारत सरकारने पाठिंबा दिला. जुनागढ मधील नवानगर,भावनगर,गोंडल हि संस्थाने यापूर्वीच भारतात सामील झाली होती. भारत सरकारने २४ सप्टेंबर १९४७ रोजी जुनागढ मध्ये लष्करी कारवाई केली. नवाब महाबतखानला पाकिस्थानला पळून जावे लागले. यानंतर शामलदास गांधी यांच्या नेतृत्वाखाली काठीयावाड जनता आघाडीच्या हंगामी सरकारची स्थापना झाली. फेब्रुवारी १९४८ मध्ये जुनागढ मध्ये सार्वमत घेण्यात येऊन जुनागढचे संस्थान भारतात विलीनीकरण करण्यात आले.

२. हैदराबाद :-

२.१ निजाम पूर्व इतिहास आणि स्थापना :

सद्यस्थितीतील आंध्रप्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगणा या राज्यामध्ये असणाऱ्या प्रदेशात हैदराबाद संस्थान विस्तारलेले होते. निजाम हा त्याचा प्रमुख प्रशासक होता, त्याचा अर्थ निजाम-उल-मुल्क म्हणजे प्रशासक. औरंगजेबाचा पंतप्रधान साहुल्लाखानाचा जावई नवाब गाझीउद्दिन खान होता, त्याच्या मुलाला म्हणजेच कमर-उद-दिन ला लहानपणीच औरंगजेबाने मनसब दिले होते. मोगल साम्राजाचा दक्षिणेकडील सुभेदार कमर-उद-दिन सिद्दिकी हा १७१३ ते १७२१ या काळात होता. १७०७ मध्ये औरंगजेबाच्या मृत्यू नंतर मोगल साम्राज्य दुर्बल झाले त्यावेळी कमर-उद-दिन सिद्दिकीने स्वतःला स्वतंत्र घोषित केले. त्याला शह देण्यासाठी दिल्लीच्या बादशाहनेच १७२४ मध्ये लढाई घडवून आणली पण त्यात कमर-उद-दिन सिद्दिकीचा विजय झाला. इ.स.१७२४ ते १९४८ या काळात त्याच्या सात पिढ्यांनी राज्य केले.मीर कमरुद्दीन खान सिद्दिकी,निजाम-उल-मुल्क,मीर अकबर आली खान, मीर फर्खुंदाह आली खान, मीर तेहनियत आली खान,मित मेहबूब आली खान, आणि मीर उस्मान आली खान यांनी राज्य केले. मात्र असे असूनही अंतर्गत स्वतंत्र असला तरी १७९८ पासून ब्रिटीशांचे वर्चस्व होते.

२.२ निजाम काळातील शासन व्यवस्था :

या काळात सरदार आणि घराणी मूळ मोगल पद्धतीने होती. राजच्या आज्ञेचे पालन ती करत असे. राजाने परवानगी दिली तेवढीच फौज ते बाळगत, युद्धावर जात, युद्धाचा खर्च निघावा म्हणून त्यांना वतने दिली जात. त्या वतनातील शेतसारा गोळा करून ठरलेला भाग राजाला पाठवला जाई. त्यांच्या वतनावर दर्जा अवलंबून राहत असत. त्या श्रेणीत खान,खान बहादूर,नवाब,जंग,दौला,मुल्क,उम्र, जाह अशी पदवी दिली जाई. तर विभागांची जबाबदारी मोगल बादशाह, वजीर, सुभेदार, निजाम इत्यादी कडे दिली जात. ब्रिटिशांच्या काळात मात्र सैन्य बाळगण्याचा अधिकार संपल्यानंतर केवळ महसूल गोळा करण्याचा अधिकार राहिला. १७५८ पासून इथे सुधारणाही सिसून आल्या. विभाग, जिल्हा, आणि तालुके पातळीवर भरती सुरु केली. पोलीस, न्याय, शिक्षण, पालिका, सार्वजनिक बांधकाम विभागाची घडी बसवली. भारत भरातून तत्कालीन सुशिक्षित मुस्लीम समाजास प्रशासनात सामावून घेण्याचा प्रयत्न केला. इ.स. १८६० मध्ये हैदराबाद-सोलापूर रस्ता, आणि १८६८ ते १८७८ मध्ये ब्रिटीशांच्या सहकार्याने हैदराबाद राज्यात रेल्वे सुरु केली. हैदराबाद संस्थांचे १६ जिल्हे मिळून चार प्रशासकीय विभाग होते. यात औरंगाबाद, गुलबर्गा,मेडक,वरंगळ विभाग होते. क्षेत्रफळाच्या दृष्टनेही सर्वात मोठे संस्थान होते.

२.३. हैदराबाद संस्थान विलीनीकरण :

हैदराबाद संस्थानात एकूण लोकसंख्या १,६३,३८,५४३ एवढी होती त्यापैकी ८५% हिंदू, १०% मुस्लीम ५% अल्पसंख्यांक होते. हैदराबाद संस्थानाचा नवाब मीर उस्मान आली खान याने पाकिस्थानच्या चिथावणीने हैदराबाद संस्थान स्वतंत्र ठेवण्याचे जाहीर केले. एवढ्यावरच न थांबता संस्थांच्या सीमा विस्तारासाठी लष्करी तयारीस सुरुवात केली.

भारत सरकार आणि निजाम यांच्यामध्ये २९ नोव्हेंबर १९४७ रोजी जैसे थे करार झाला. यामुळे माउंट बेटनला वाटाघाटीसाठी अवसर मिळणार होता. निजामाने मोक्टन यास आपला वकील म्हणून वाटाघाटीस पाठवले.निजाम आणि

भारत सरकार यांच्यातील वाटाघाटीत अडथला आणण्याचा प्रयत्न इतिहाद नावाच्या कट्टर धर्मनिष्ठ मुस्लीम संघटनेचा नेता कासीम रिझवी करत होता. निजामानेही जैसे थे परिस्थितीचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला.

जैसे थे करारानंतरही हैदराबाद मध्ये घडून आलेल्या महत्वपूर्ण घडामोडी:-

- निजामाने इतिहाद या कट्टर मुस्लीम संघटनेच्या माध्यमातुन रझाकार या निमलष्करी दलाची निर्मिती केली.
- हैदराबाद काँग्रेसने ७ ऑगस्ट १९४७ पासून निजामाने लोकप्रतिनिधींचे सरकार नेमावे यासाठी सत्याग्रह सुरु केला यामुळे रझाकार या निमलष्करी दलाने संस्थानातील प्रजेवर भयंकर स्वरूपाचे अत्याचार केले सीमेवरील ७१ खेडी उद्ध्वस्त केली. १४० वेळा भारतीय प्रदेशावर आक्रमण केले. कोट्यावधी मालमत्तेचे नुकसान केले.
- हैदराबाद संस्थानात तेलंगणा भागात १९४६ च्या उत्तरार्धात शेतकरी आंदोलन घडून आले. हैदराबाद मुक्ती आंदोलनामुळे शेतकरी आंदोलनाला पुन्हा जोर चढला रझाकारांचा अन्याय अत्याचाराचा सामना करण्यासाठी त्यांनी शेतकरी संरक्षक दलाची निर्मिती केली व या दलाच्या माध्यमातून जमीनदारांवर हल्ले केले. व त्यांच्या ताब्यातील जमिनी शेतकरी व भूमिहीन यांना वाटून दिल्या.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सरदार पटेलांनी पंतप्रधानांना कळविले, कोणत्याही परीस्थितीत हैदराबाद संस्थान विलीनीकरण करून तेथे प्रतिनिधी सरकार स्थापन केले पाहिजे. कोणताही दुसरा पर्याय शिल्लक नसल्याने शेवटी रझाकारांच्या अन्याय अत्याचाराला लगाम घालण्यासाठी पोलिसी कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला. यानुसार १३ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद मध्ये लष्करी कारवाई करण्यात आली. या कारवाईला ऑपरेशन पोलो असे नाव देण्यात आले. (कारण त्यावेळी फक्त हैदराबाद मध्येच जगातील जास्त म्हणजे एकूण १७ पोलो मैदान होते.)भारतीय सैन्याचे नेतृत्व त्यावेळी मेजर जनरल जे.एन.चौधरी यांच्या नेतृत्वाखाली कारवाई सुरु झाली. चार ते पांच दिवसाच्या कारवाई नंतर १८ सप्टेंबरला हैदराबाद ताब्यात आले. १३७३ रझाकार मारले गेले. हैदराबादचे ८०७ जावन हि मारले गेले. भारतीय सैन्याने ६६ जवान गमावले.

अशा पद्धतीने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यात आले. १९४९ मध्येच एस. के. वेलोडी या आय.सी.एस.अधिकाऱ्याने निवडणुका घेऊन तेथे काँग्रेसचे सरकार आले.

३. काश्मीर प्रश्न:-

काश्मीर संस्थानात लद्दाख, गिलगीट, काश्मीर, खोरे व जम्मू या प्रदेशांचा समावेश होते. काश्मीर संस्थाचा हरिसिंग हा हिंदू राजा होता. तर तेथील बहुसंख्य प्रजा मुसलमान होती. भारताला स्वातंत्र्य मिळण्या आधी माउंट बेटन यांनी राजा हरिसिंग यांच्याशी विलीनीकरणाबाबत चर्चा केली होती, परंतु राजा हरिसिंग यांनी काश्मीर संस्थान स्वतंत्र राष्ट्र म्हणून ठेवण्याचा निर्णय घेतला. काश्मिर संस्थानात बहुसंख्य प्रजा मुसलमान असल्याने हा प्रदेश पाकिस्तानात सामील व्हावा अशी पाकिस्तानची इच्छा होती. परंतु राजा हरिसिंग यांच्या स्वतंत्र काश्मीरच्या भूमिकेमुळे तसे होणे कठीण होते. पाकिस्तानने काश्मीरबाबत आक्रमक भूमिका स्वीकारली, बेरीस्टर जीनांनी मेजर शहा यास काश्मीरमध्ये पाठवून राजा हरिसिंग यांच्या विरोधात उठाव करण्याचा प्रयत्न केला. मेहरचंद महाजन हे या वेळी काश्मीरचे पंतप्रधान होते. त्यांनी पाकिस्थानातुन जैसे थे कराराचा भंग होत असल्याची तक्रार ब्रिटीशांकडे केली. २२ ऑक्टोबर १९४७ रोजी पाकीस्तानने लष्करी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ३० हजार पठाण सेने द्वारे काश्मीर खोऱ्यात घुसखोरी करण्यात आली.संपूर्ण सीमा आगीच्या ज्वालांनी वेढली होती. लुट,अपहरण होत होते, सामुहिक नरसंहार सुरु होता. सीमेपासून ४ मैल आतील हिंदू व शिखांच्या ७५% हून अधिक घरांना जाळण्यात आलेलं होते. पुरुष, महिला, मुलांना मारून टाकण्यात आले होते. पाकिस्थांनचा हा हल्ला पूर्वनियोजित होता. अशी हि सेना अत्यंत वेगाने काश्मीरची राजधानी श्रीनगरकडे धाव घेऊ लागली.पाकिस्तानच्या आक्रमणास तोंड देऊ शकेल एवढे लष्कर राजा हरीसिंगणे भारताकडे मागितले. पंतप्रधान पंडित नेहरूंनी राजाज हरिसिंग यांना भारतात सामील होण्याच्या करारावर स्वाक्षरी करण्याच्या नंतर भारतीय सेना पूर्ण सहकार्य करेन आणि आलेल्या संकटातून बाहेर काढेन. दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याने तत्कालीन गृहमंत्री व संस्थान मंत्रालय प्रमुख सरदार पटेल यांचे सचिव व्हि.पी मेनन यांच्या उपस्थितीत राजा हरिसिंग यांनी सामीलनाम्यावर २६ ऑक्टोबर १९४७ रोजी स्वाक्षरी केली. यामुळे कायदेशीररीत्या काश्मीर संस्थानाचे भारतामध्ये विलीनीकरण झाले. काश्मीर संस्थान भारतात सामील होताच भारत सरकारने अत्यंत तातडीने हवाई मार्गे आपली सेना काश्मीरमध्ये पाठविली.तोपर्यंत घुसखोर श्रीनगर पर्यंत पोहचले होते, परंतु